

# युवा संघर्ष यात्रा

महाराष्ट्रातील युवावर्ग हा एकूण लोकसंख्येच्या ४०% पेक्षा जास्त असून तो आपल्या राज्याचे भविष्य आहे. तथापि, अलिकडच्या काही वर्षांत युवांना त्यांच्या पूर्ण क्षमतेचा वापर करण्यासाठी सरकारकडून आवश्यक तसे प्रोत्साहन मिळत नाही. सध्या आपल्या राज्यात बेरोजगारीचा वाढता दर, परीक्षा आयोजित करण्यात दीर्घकाळ होणारा विलंब, पेपरफुटी, अवाजवी परीक्षा शुल्क, कायमस्वरूपी पदांऐवजी कंत्राटी नोकऱ्या, रोजगार उपलब्ध करू शकणारे राज्याचे हक्काचे मोठमोठे प्रकल्प दुसऱ्या राज्यात जाणे या आणि इतर असंख्य समस्यांनी युवांचे भविष्य धोक्यात आले आहे. यासाठी युवांनी एकत्रित येऊन सरकारला युवा कल्याणकारी धोरणे आखण्यास तसेच अतिशय महत्त्वाच्या अशा तरुण पिढीच्या आकांक्षा आणि कल्याणासाठी स्पष्टपणे अनुकूल निर्णय घेण्यास भाग पाडण्याची वेळ आली आहे.

आमदार रोहित पवार यांनी याआधी विधानसभेच्या अधिवेशनात या गंभीर बाबी उपस्थित केल्या आहेत. अनेकदा अर्ज-विनंत्या केल्या किंबहुना धरणे, उपोषण अशी रस्त्यावरची लढाईही लढली. मात्र सरकारच्या प्रतिसादात ठोस कृतीचा अभाव असल्याचे पाहायला मिळाले. सातत्याने युवांच्या प्रश्नाकडे राज्य शासन उदासीन असून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. याविरोधात आता महाराष्ट्रातील तमाम युवावर्गालाच रस्त्यावर उतरून राज्य पातळीवर सामूहिक आंदोलन उभारण्याची वेळ आली आहे आणि यासाठीच 'युवा संघर्ष यात्रा' या युवाकेंद्रित पदयात्रेचे राज्यव्यापी आयोजन करण्यात आले आहे.

ही पदयात्रा युवांनी सामूहिकपणे थेट रस्त्यावर उतरून युवांना प्रकर्षाने भेडसावणाऱ्या आव्हानांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी काढण्यात येत आहे. यामुळे आपल्या न्याय्य मागण्यांचा लढा लढणाऱ्या युवांचा संघटित आवाज अधिक बुलंद होण्यास निश्चित मदत होईल आणि या सामूहिक आवाजाची दखल सरकारलाही घ्यावी लागेल.

## युवा संघर्ष यात्रेबाबत....

ही पदयात्रा युवांना संघटित करून एकत्रित आणण्यासाठी आणि महाराष्ट्रातील तरुणांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्रतीकात्मक परंतु शक्तिशाली साधन आहे. सरकारने निर्णायकपणे कार्य करणे आणि या विविध समस्यांचे त्वरित निराकरण करणे आवश्यक आहे, यावर या यात्रेत भर देण्यात येणार आहे. युवा संघर्ष यात्रा ही युवा पिढीच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या भविष्याला मूर्त रूप देण्यासाठी युवांनी सुरू केलेली एक प्रभावी चळवळ आहे.

या युवा संघर्ष पदयात्रेचा एक भाग आणि युवांचे प्रतिनिधी म्हणून आमदार रोहित पवार हे अनेक युवांसोबत पुणे ते नागपूर पायी चालत जाणार असून राज्यातील युवांपुढील आव्हाने सोडवण्यासाठी जनतेमध्ये सक्रियपणे सहभागी होणार आहेत. संपूर्ण पदयात्रेदरम्यान, जनतेला मुख्यत्वे युवांना त्यांच्या समस्या आणि अपेक्षा व्यक्त करण्याची संधीही या यात्रेत मिळणार आहे आणि ज्या मुद्द्यांना प्राधान्य दिले पाहिजे अशा मुद्द्यांवर सविस्तर चर्चाही करता येणार आहे. नागपुरात यात्रेची सांगता झाल्यावर राज्यभरातून युवांनी केलेल्या मागण्यांकडे आमदार रोहित पवार विधानसभेच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात हे मुद्दे मांडून त्याकडे सरकारचे लक्ष वेधतील.

| युवा संघर्ष यात्रेचा प्रारंभ | मार्ग | एकूण दिवस | एकूण अंतर |
|---|---|---|---|
| **२४ ऑक्टोबर २०२३** | **पुणे ते नागपूर** | **४५** | **८००+ किमी.** |

यात्रेला पाठींबा देण्यासाठी
**मिस कॉल द्या 90983 90983**

नोंदणी करण्यासाठी, भेट द्या
**www.yuvasangharshyatra.com**

स्कॅन करा

/RRPspeaks /Rohit_Rajendra_Pawar